**महाराष्ट्र शासन**

**कुंभमेळा आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**

**जुनी जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, नाशिक - 422001**

**दुरध्वनी क्र. 0253-2977374 Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/सप्टेंबर-इतिवृत्त/368/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1. मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
2. मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
3. मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
4. मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
5. मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
7. मा.सह आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
8. मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
9. मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
10. मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11. मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
12. मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
13. मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14. मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ नाशिक
15. मा.सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक
16. मा.सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग.
17. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.नाशिक
18. मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
19. मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
20. मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
21. मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
22. मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर, दक्षिण व पुर्व) नाशिक
23. मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
24. मा.शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका
25. मा.मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
26. मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.
27. मा.कार्यासन अधिकारी, ना.त्र्यं.कुं.मे.प्रा.कार्यालय, नाशिक
28. व इतर सर्व संबंधीत यंत्रणा

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे दि.08/09/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दि.08 सप्टेबर 2026 रोजी मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पाठविण्यात येत असून इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

**आपला विश्वासु**

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 28-09-2026 11:59:35

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर..**

१) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र.

२) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.जिल्हाधिकारी, नाशिक

## नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. ०८/०९/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

दि.०८.०९.२०२६ रोजी मा.डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीतील उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे.

कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले. बैठकीच्या सुरुवातीला प्राधिकरणाच्या दि. २५.०८.२०२६रोजी झालेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन करून त्यास सर्वानुमते मंजुरी देण्याबाबत विनंती केली त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. त्यानंतर अजेंड्यावरील विषयांवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**भाग-१: शिखर समितीने मान्यता दिलेले विषय (नियम १ ते ६)**

- **विषय क्र. १ - नाशिक येथील सिंहगड, शिवनेरी, रायगड येथील विश्रामगृहातील कक्षांचे नूतनीकरण करणेबाबत**

या कामाचा एकूण प्रस्तावाचा खर्च**रु. १०.२५ कोटी** (शिवनेरी: रु. ५.०० कोटी, रायगड: रु. २.०० कोटी, सिंहगड: रु. ३.२५ कोटी) इतकाअसल्याची माहिती संबंधित विभागाने दिली.सुमारे २० वर्षांपासून नूतनीकरण न झाल्याने इमारतीमध्ये गळती व फर्निचर खराब झाल्याच्या बाबीवर चर्चा झाली. मा. मंत्री व लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त तक्रारी लक्षात घेता, कुंभमेळा नियोजनात येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या व्यवस्थेसाठीसदरचे काम आवश्यक असल्याची चर्चा करण्यात आली.

जास्त देखभाल लागणाऱ्या बाबींवर अनावश्यक जास्त खर्च न करता कमी देखभाल लागणाऱ्या बाबींच्या वापराच्या पर्यायाचा विचार केल्यास फायदा होऊ शकेल अशा सुचना देण्यात आल्या. कामांची आवश्यकता विचारात घेऊन कामे मार्च २०२७पर्यंत पुर्ण होतील याद्दष्टीने आवश्यक पुढील प्रक्रीया प्रचलित नियमांनुसार राबविण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. २ - सिन्नर येथील शासकीय विश्रामगृहाचे दुरुस्ती व नूतनीकरण करणेबाबत**

या कामासाठी**रु. १.२५ कोटी** इतकी वित्तीय तरतूद प्रस्तावित आहे. सिन्नर शहरातील प्राचीन गोंदेश्वर मंदिर, समृद्धी महामार्ग व सिंहस्थासाठी येणारे अति महत्त्वाचे व्यक्ती आणि भाविक लक्षात घेता, विश्रामगृहाचे २ कक्ष व प्रसाधनगृह नूतनीकरण, वॉटरप्रूफिंग आणि रंगरंगोटीच्या कामाची आवश्यकता असल्यामुळेप्रस्ताव सादर केल्याचे यंत्रणेने सांगीतले.

"केवळ २ खोल्या व प्रसाधनगृहाच्या" दुरुस्ती व वॉटरप्रूफिंगसाठी रु. १.२५ कोटींचा खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे PWD च्या सध्याच्या DSR (District Schedule Rates) नुसार या खर्चाची "पुनर्पडताळणी (Cost Audit)" करण्यात यावी. आवश्यक पुनर्पडताळणीनंतरच प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात येतील तसेच कामांची आवश्यकता विचारात घेऊन कामे मार्च २०२७पर्यंत पुर्ण होतील याद्दष्टीने आवश्यक पुढील प्रक्रीया प्रचलित नियमांनुसार राबविण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ३ - त्र्यंबकेश्वर येथील शासकीय विश्रामगृहाचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे**

या कामासाठी **रु. ६.४४ कोटी** खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. मागील १२ वर्षांपासून नूतनीकरण न झालेल्या या इमारतीच्या गळती व दुरुस्तीबाबत चर्चा झाली. संपूर्ण भारतातून येणाऱ्या अतिथींच्या व अधिकाऱ्यांच्या चांगल्या व्यवस्थेसाठी कामांची आवश्यकता विचारात घेऊन कामे मार्च २०२७पर्यंत पुर्ण होतील यादृष्टीने आवश्यक पुढील प्रक्रीया प्रचलित नियमांनुसार राबविण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ४ - इगतपुरी पिंप्री सदो येथे ६ कक्षांचे नवीन विश्रामगृह बांधणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

या प्रकल्पाचा अंदाजित खर्च **रु. ५.०० कोटी** आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग व समृद्धी महामार्गालगत लोकप्रतिनिधी आणि व्ही.आय.पी. यांच्या वाढत्या शासकीय दौऱ्यांमुळे अस्तित्वातील व्यवस्था अपुरी पडत असल्याचा आढावा घेण्यात आला. कामाचे ठिकाण व त्याची रचना याची माहिती घेण्यात आली. नवीन बांधकाम करत असल्यामुळे चांगला प्लान तयार करुन सदरचे काम केल्यास योग्य होईल अशा सुचना देण्यात आल्या. कामांची आवश्यकता विचारात घेऊन कामे मार्च २०२७पर्यंत पुर्ण होतील यादृष्टीने आवश्यक पुढील प्रक्रीया प्रचलित नियमांनुसार राबविण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ५ - आपत्ती प्रतिसाद साहित्य, उपकरणे, प्रशिक्षण, शोध व बचाव पथक, वाहने व इतर आवश्यक संसाधनांची उपलब्धता करून देणे**

या कामासाठी **रु. २.५६ कोटी** इतका खर्च पुनर्पडताळणी करून प्रस्तावित केला असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक यांनी सांगीतले. सदरचा प्रस्ताव हा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मागितलेल्या प्राथमिक उपचार, शोध-बचाव साहित्य, स्लज पंप, मॉक ड्रिल व स्वयंसेवक व्यवस्थापनावर होणार असल्याबाबत चर्चा झाली. तसेच सदरचा प्रस्ताव हा शासनाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत केंद्र शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीच्या बाहेर असल्याची माहिती देण्यात आली. पुढील आवश्यक प्रक्रियेतील संभाव्य विलंब टाळून 'झिरो कॅज्युअल्टी' उद्दिष्टासाठी काम करण्याच्यासुचना देण्यात आल्या. कामे मार्च २०२७ पर्यंत पुर्ण होतील यादृष्टीने आवश्यक पुढील प्रक्रीया प्रचलित नियमांनुसार राबविण्याच्या अटीवरप्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ६ - महा सिंहस्थ कुंभ २०२७ संदर्भातील संशोधन प्रस्ताव (शैक्षणिक संस्था भागीदारी) एमआयटी सेन्सिबल लॅब**

एमआयटी (MIT) च्या एआई (AI) द्वारेगर्दी व वाहतुक परीसंचालनाचे व्यवस्थापन मॉडेल विकसित करण्याबाबतच्या IIM Nagpur यांच्या यापुर्वी मंजूर केलेल्या प्रकल्पाचाच पुरक भाग म्हणुन हा शैक्षणिक संस्था भागीदारीचा प्रयोग राबविण्यात येणार असल्याची माहिती कुंभमेळा आयुक्त यांनी दिली. संगणकीय डेटा विश्लेषण, मॉडेलिंग व व्यवस्थापन विषयक बाबी व त्याद्वारेगर्दी नियंत्रण प्रक्रीया राबवुन सिंहस्थ महाकुंभमेळा कालावधी मध्ये नियोजन करण्याचा मानस असल्याचे सांगीतले. या प्रस्तावाकरीता उच्चाधिकार समितीची मान्यता आवश्यक आहे का? अशी मा अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली. कुंभमेळा आयुक्त यांनी सदरचा प्रस्ताव यापुर्वीच नगरविकास विभागाकडे मान्यतेसाठी सादर केल्याचे सांगीतले. तसेच या प्रस्तावाला उच्चाधिकार समितीस सादर करण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता आवश्यक असल्याची चर्चा झाली.एकात्मिक वाहतूक (परिसंचालन) आराखडा (Integrated Mobility Plan) तयार करण्यासाठी इंडियन इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट ( IIM) नागपुर यांचे मदतीने सिमुलेशन SOFTWARE विकसीत करण्याच्या प्रकल्पाकरीता मंजूर रक्कम रु.१५ कोटींपैकी केवळ १२.०९ कोटींची प्रशासकीय मान्यता यापुर्वी देण्यात आली आहे. प्रस्तावित कामामुळे याप्रकल्पाचे मुल्यवर्धन होणार असल्यामुळे उर्वरित रक्कम रु.२.९१कोटीची तरतूद व इतर बचतीमधुन या प्रकल्पासाठी आवश्यक अंदाजे रक्कम रु. ६.००

कोटीची तरतूद करणेत येणार असल्याचे सांगीतले. सदर प्रस्ताव उच्चाधिकार समितीकडे मान्यतेस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास उपरोक्त प्रमाणे सर्वानुमते मान्यता दिली.

**भाग-२: शिखर समितीची मान्यता नसलेले विषय**

- **विषय क्र. ७ - गंगापूर प्रकल्पाचा नाशिक डावा तट कालवा २१/०२० किमी बंदिस्त करणे**

या कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी **रु. ४५०.३५ कोटी** प्रस्तावित आहेत. नाशिक शहराच्या पूर्व-पश्चिम रिंग रोडला जोडण्यासाठी व निफाड-नाशिक मधील १० गावांना स्वच्छ पाणी मिळण्यासाठी कालवा बंदिस्त करणे आवश्यक असल्यामुळे प्रस्ताव सादर केल्याचे नमूद केले. कालवा बंदिस्त केल्यामुळे शेती करणा-या शेतक-यांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. तसेच सदरचे काम मार्च २०२७ अखेरपर्यंत पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या. आवर्तनाचे योग्य नियोजन करूनव आवश्यक सुरक्षा विषयक बाबींची खात्री करुन पुढील कार्यवाही करण्याच्या व शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र. ८ - कुंभ सुरक्षेसाठी अतिरिक्त १४४४ सीसीटीव्ही कॅमेरे व आयसीसीसी (ICCC) बळकटीकरण (Change Request)**

पोलिस विभागाच्या अतिरिक्त मागणीमुळे व पार्किंग क्षेत्रातील व साधुग्राम परीसरातील नियोजनामुळे आवश्यक अतिरिक्त 1444 सीसीटीव्ही कॅमेरे व आयसीसीसी (ICCC) चे आवश्यक घटकांकरीता वाढीव रक्कम रु. ८७.९६ कोटीची आवश्यकता असल्याचे यंत्रणेने सांगीतले. सुधारित प्रशासकीय मान्यता रक्कम रु.४५९.६६ कोटी होत असुन मुळ प्र. मा रक्कम रु. 371.70 कोटी असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले. सदर प्रस्तावाची अतिरिक्त वाढीची टक्केवारी ही 23.66 % असल्याचे नमुद केले. नाशिक शहर व ग्रामीण पोलिसांच्या सुधारित मागणीनुसार डेटा सेंटर बळकटीकरण, ४ X २ व्हिडिओ वॉल आणि आयसीसीसी विस्तारावर चर्चा झाली. तसेच नाशिक सहहरा बाहेरील बाह्य वाहनतळांच्या ठिकाणी सीसीटीव्हींच्या तरतुदीवरही चर्चा करण्यात आली. सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी काम पूर्ण करण्याच्या अटीवरव या प्रस्तावाला पायाभूत सुविधा समितीची मान्यता घेऊनच पुढील कार्यवाही करण्याच्या वशिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून,अटीवर सर्वानुमते मान्यता दिली.

बैठक- इतिवृत्त

- **विषय क्र. ९ - नाशिक व त्र्यंबकेश्वर सिटी नेटवर्क बॅकबोन अंतर्गत अतिरिक्त ९० किमी ओएफसी (OFC) नेटवर्क टाकणे**

या प्रस्तावाचा खर्च**रु. २०.६६ कोटी** (सुधारित एकूण खर्च: १४९.६५ कोटी) इतका आहे. अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कनेक्टिव्हिटीसाठी ९० किमी वाढीव फायबर केबल टाकण्याच्या सोळा टक्के वाढीव वित्तीय तरतुदीस व २ वर्षांच्या देखभाल-दुरुस्ती (O&M) अटीसह सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी काम पूर्ण करण्याच्या अटीवरव या प्रस्तावाला पायाभूत सुविधा व शिखर समितीची / शासनाची मान्यता घेऊनच पुढील कार्यवाही करण्याच्या अटीवर सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १० - पोलीस ठाण्यांमध्ये कोअर स्विच सुविधेसाठी इनक्लोजर तयार करणे व स्मार्ट सिटी कार्यालयातील ICCC मध्ये विविध यंत्रणांकरीता बसण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक उपाययोजना करणे**

या प्रकल्पाचा अंदाजित खर्च **रु. ०.६१३० कोटी** (६१ लाख ३० हजार) आहे. १४ पोलीस ठाण्यांमध्ये बायोमेट्रिक अॅक्सेससह सुरक्षित नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे आणिस्मार्ट सिटी कार्यालयातील **ICCC मध्ये** विविध भागधारकांसाठी कार्यात्मक जागा निर्माण करण्यासाठी प्रस्ताव सादर केल्याचे यंत्रणेने सांगीतले. सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. ११ - तपोवन साधुग्राम येथील नाशिक मनपाच्या ताब्यातील क्षेत्रात संरक्षक भिंत उभारणे**

या कामाचा अंदाजित खर्च **रु. ३.७८ कोटी** आहे. प्रमुख आखाड्यांच्या जागा वाटपामुळे हा भाग अत्यंत संवेदनशील असून, अतिक्रमण रोखण्यासाठी पाईल फाउंडेशन व प्रीकास्ट भिंत उभारणे आवश्यक असल्याची माहिती यंत्रणेने दिली. साधुग्रामच्या जागा अंतिमीकरणाची प्रक्रीया तातडीने पुर्ण करुन घेणेबाबत चर्चा करण्यात आली. मनपाने सदरचे काम तातडीनेपूर्ण करावे व नंतर त्याच्या देखभाल व दुरुस्तीची व्यवस्था करावी अशा सुचना देण्यात आल्या. सदरचे काम मार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १२ - महामार्ग बसस्थानक येथे अतिरिक्त वाहनतळाचे कॉंक्रिटीकरण करणे**

या अतिरिक्त कामासाठी **रु. ५.०० कोटी** प्रस्तावित करण्यात आले होते परंतु सदर कामासाठी रक्कम रु.४.०० कोटींचीच तरतूद करण्यात यावी असे यंत्रणेने सांगीतले. संभाव्य गर्दी व बसेसच्या पार्किंगसाठी पूर्वनियोजित ४५०० चौ.मी. क्षेत्र अपुरे पडत असल्याने रिक्त जागेत अतिरिक्त कॉंक्रिटीकरण व वॉशिंग रॅम्प उभारण्यास, तसेच ठेकेदाराने १० वर्षांच्या देखभाल सदरचे काम मार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १३ - त्र्यंबक नगरपरिषद हद्दीतील पिंपळद रोड व बिल्वतीर्थ रिंग रोड येथील विद्युतपोल.**

या कामाची वित्तीय तरतूद **रु. ०.५२ कोटी** आहे. महावितरणची १.३२ किमी एच.टी. लाईन आणि ३.७२ किमी एल.टी. लाईन शिफ्ट करून एबी केबल टाकण्यास व रहदारी सुरळीत करण्यास ३ महिन्यांच्या कालावधीत काम पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १४ - त्र्यंबक नगरपरिषदेच्या अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेतील पंपिंग मशिनरीचे नूतनीकरण करणे:**

या प्रस्तावाचा खर्च **रु.२.०२ कोटी** आहे. जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्रातील जुनी यंत्रसामग्री वारंवार नादुरुस्त होत असल्याने सिंहस्थ काळात पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ६ महिन्यांच्या आत नूतनीकरण करण्याच्या प्रस्तावास सदरचे काम मार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची /

शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १५ - चांदवड-लासलगाव रस्ता (रामा-०७, सा.क्र. १७४/४०० ते १९१/४००) रुंदीकरण वसुधारणा करणे:**

या रस्त्याच्या सुधारणेचा खर्च **रु. ७५.८२ कोटी** आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्ता ५.५० मी. वरून ११ मी. रुंद करणे, पुलांचे रुंदीकरण व जंक्शन सुधारणा करणे गरजेचे आहे. ६ महिन्यांत काम पूर्ण करून अत्यावश्यक सेवांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करण्याच्या व सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर व या प्रस्तावाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १६ - MIT व NTKMA: कुंभदूत (KumbhDoot) संशोधन व प्रोटोटायपिंग प्रकल्प:**

या डिजिटल असिस्टंट प्रकल्पाचा खर्च **USD १,५०,०००** (अंदाजे रु. १.५० कोटी) इतका आहे. विश्वसनीय नागरी माहिती वितरण व वैयक्तिकरणासाठीच्या या संशोधन प्रकल्पाला उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी पाठविण्याकरीता प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले. सदर निधी अमेरिकन डॉलरमध्ये द्यायचा असला तरी सदर प्रस्तावास शासनाकडुन मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेस्तव प्राधिकरणाच्या बैठकीत पुनःश्च ठेवण्यात येईल. प्रस्ताव पुढील उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी शासनाकडे पाठवण्याकरीता प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १७ - जानोरी-ओझर ता. दिंडोरी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ ते राष्ट्रीय महामार्ग चौपदरी रस्त्यावर नवीन पुलाचे व स्लॅब ड्रेनचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

या कामासाठी **रु. ८.७४ कोटी** इतकी वित्तीय तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. या मार्गावर सा.क्र. १३/४५० वर सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या ३० मी. लांबीच्या पुलाची उंची (RIL Top Level) अपुरी असल्याने, पावसाळ्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर हा पूल पूर्णपणे पाण्याखाली जातो. यामुळे नाशिक आंतरराष्ट्रीय विमानतळाची वाहतूक आणि आपत्कालीन सेवा विस्कळीत होत असल्याच्या बाबीवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विमानतळ व स्थानिक नागरिकांची वाहतूक अखंडित व सुलभ ठेवण्यासाठी, सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतर आणि **माहे मार्च २०२७ अखेरपर्यंत** काम पूर्ण करण्याच्या अटीवर, वकुंभमेळा शिखर समितीच्या / शासनाच्या मान्यते नंतरच कामाचे कार्यारंभ आदेश देण्याच्या अटीवरप्राधिकरणाने या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान केली.

बैठक- इतिवृत्त

- **विषय क्र. १८ - नाशिक येथे अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिकृती व त्र्यंबकेश्वर येथील विविध प्रतिकृती उभारण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात धार्मिक व सांस्कृतिक वारसा दर्शवणाऱ्या विविध प्रतिकृती आणि अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिकृती उभारण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. या कामाची आवश्यकता व भाविकांच्या दृष्टीने असणारी उपयुक्तता विचारात घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच पुतळा उभारणी करताना आवश्यक त्या सर्व पुर्वपरवानग्या घेऊनच पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व गृह विभाग निर्देशः सार्वजनिक ठिकाणी पुतळे किंवा प्रतिकृती उभारणीसाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घेऊनच कामास सुरुवात करणे अनिवार्य आहे. तसेच पुतळा उभारणी साठी आवश्यक उपलब्ध व पर्यायी जागेचाही विचार करण्यात यावा. सदरचे काम मार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवरव या प्रस्तावाला विहीत कार्यपध्दतीनुसार शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कामाचे

कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत, या अटीच्या अधीन राहून, रक्कम रु.०६.०९ कोटी अंदाजित किंमतीस सर्वानुमते मान्यता दिली.

- **विषय क्र. १९ - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ करिता जमीन (Plot) वाटप व टेंट सिटीव्यवस्थापन पोर्टलचे डिझाईन, विकास, होस्टिंग व देखभाल यासाठी संस्थेची निवडकरण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत:**

कुंभमेळा कालावधीत येणारे विविध आखाडे, साधू-महंत आणि संस्थांना जमिनीचे (Plots) पारदर्शक वाटप करणे आणि टेंट सिटीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली विकसित करण्याबाबत चर्चा झाली. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडुन विकसीत करण्यात येणा-या संकेतस्थळाच्या कामामध्ये समाविष्ट आहे का अशी विचारणा करण्यात आली. या कामाच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र संकेतस्थळ (Portal) व सॉफ्टवेअर विकसित करणे, त्याचे डिझाईन, होस्टिंग आणि देखभाल करण्यासाठी विकसीत करण्यात येत असलेल्या संकेतस्थळाची मुलभूत संरचना व या कामासाठी आवश्यक घटक भिन्न असल्यामुळे स्वतंत्र काम विकसीत करणे आवश्यक असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले.या डिजिटल प्रणालीच्या उपयुक्ततेची खात्री करून घेण्याच्या व कामाची द्विरुक्ती होणार नाही याची खात्री करण्याच्या सुचना दिल्या. या विषयाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कार्यारंभ आदेश किंवा पुरवठा आदेश देण्याच्या अटीवर सदर कामाला रक्कम रु. ०.८० कोटी अंदाजित किंमतीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र. २० - नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ साठी स्वयंसेवक व्यवस्थापन संकेतस्थळ (Portal) व App तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

सिंहस्थ कुंभमेळ्यासारख्या अत्यंत मोठ्या जनसमुदायाच्या व्यवस्थापनासाठी आणि विविध विभागांना सहकार्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवकांची (Volunteers) आवश्यकता भासणार आहे. या स्वयंसेवकांची ऑनलाइन नोंदणी, त्यांचे योग्य वाटप, उपस्थिती आणि व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी एक मध्यवर्ती 'Volunteer Management Portal' आणि मोबाईल ॲप (App) तयार करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या कामाच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र संकेतस्थळ (Portal) व सॉफ्टवेअर विकसित करणे, त्याचे डिझाईन, होस्टिंग आणि देखभाल करण्यासाठी विकसीत करण्यात येत असलेल्या संकेतस्थळाची मुलभूत संरचना व या कामासाठी आवश्यक घटक भिन्न असल्यामुळे स्वतंत्र काम विकसीत करणे आवश्यक असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले.या डिजिटल प्रणालीच्या उपयुक्ततेची खात्री करून घेण्याच्या व कामाची द्विरुक्ती होणार नाही याची खात्री करण्याच्या सुचना दिल्या. या विषयाला शिखर समितीची / शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच कार्यारंभ आदेश किंवा पुरवठा आदेश देण्याच्या अटीवर सदर कामाला रक्कम रु. ०.७० कोटी अंदाजित किंमतीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बैठक- इतिवृत्त

---

**भाग-३: यंत्रणा बदल वइतरविषय**

- **विषय क्र. २१ (यंत्रणा बदल):**कावनई, टाकेद, बेझे येथील विकास कामे जिल्हा परिषद ऐवजी **सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यास** सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- **विषय क्र. २२ (यंत्रणा बदल):** तांत्रिक व अंमलबजावणीच्या कारणास्तव विशिष्ट कामे पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्या ऐवजी **स्मार्ट सिटी नाशिक महानगरपालिका (ICCC)**कडे वर्ग करण्यास सदरचे काममार्च-२०२७ पूर्वी पूर्ण करण्याच्या अटीवर मंजुरी देण्यात आली.

---

**बैठकीत झालेली इतर महत्वपूर्ण चर्चा:-**

१. ज्या प्रस्तावांना (विशेषतः भाग-२ मधील) अद्याप शिखर समितीची / शासनाची मंजुरी नाही, अशा सर्व प्रस्तावांची मान्यता त्वरीत प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. दि. १३.०३.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत शिखर समितीने सिंहस्थ कुंभमेळा-२०२७ च्या विकास आराखड्यास (कुंभमेळा योजना) मान्यता प्रदान केली आहे. सदर विकास आराखड्यात समाविष्ट नसणारी परंतु या बैठकीत तातडीने मान्यता देणे आवश्यक असलेल्या कामांना मंत्री समितीच्या सल्ल्याने शिखर समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम-२०२५ कलम ७ (१) अन्वये आवश्यक आहे. त्यामुळे ज्या कामांना अद्याप शिखर समितीची मान्यता नाही त्या कामांना शिखर समितीची / शासनाची मान्यता प्राप्त झाल्या शिवाय कोणत्याही कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित केले जाऊ नयेत.

२. सर्व प्रस्तावित कामे कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी (मार्च २०२७ पूर्वी) पूर्ण होण्याची खात्री संबंधित यंत्रणांनी करावी. वेळेत काम पूर्ण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील.

३. माहिती व तंत्रज्ञानाशी (आय टी) संबंधित प्रकल्पांचे शक्य त्या ठिकाणी एकत्रीकरण करुन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात यावी.

कुंभमेळा आयुक्त यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त केली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 26-09-2026 17:16:02

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष,**
**नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**तथा विभागीय आयुक्त, नाशिक.**

बैठक- इतिवृत्त

# दि.०८.०९.२०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

१. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

२. मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक .(VC व्दारे)

३. मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.

४. महानगर आयुक्त, नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण. (VC व्दारे)

५. आयुक्त, नाशिक महानगरपालिका.

६. जिल्हाधिकारी नाशिक. (VC व्दारे)

७. जिल्हाधिकारी अहिल्यानगर.

८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.

९. सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.

१०. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळ (एसटी), नाशिक विभाग.

११. उपसंचालक,आरोग्य विभाग, नाशिक. (VC व्दारे)

१२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.

१३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक. प्रतिनिधी

१४. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.

१५. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) नाशिक. प्रतिनिधी

१६. सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.

१७. मुख्याधिकारी, त्र्यंबकेश्वर नगर परिषद.

१८. निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

१९. शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका

२०. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.नाशिक (VC व्दारे)

२१. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक

२२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर, दक्षिण व पुर्व) नाशिक

२३. व इतर अधिकारी